Publication : Prahaar
Dated : 10.07.2020
Page: 1

# 'जूनच्या वीज बिलावर व्याज आकारणार नाही'

**मुंबई :** लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर वीज वितरण कंपन्यांकडून अवाच्या सव्वा बिल आल्याने ग्राहकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. त्यामुळे ठिकठिकाणी आंदोलनं होत असतानाच अदानी एनर्जी मुंबई लिमिटेडने (एईएमएल) महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ग्राहकांच्या जूनच्या बिलावर कुठलेही व्याज न आकारण्याचा आणि तीन हप्त्यात बिल भरणाऱ्यांवर कुठलेही विलंब शुल्क न लावण्याचा निर्णय अदानी एनर्जीने घेतला आहे. त्यामुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, एईएमएलचे मुंबईत २५ लाख घरगुती वीज ग्राहक आहेत.